17 JUL 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञानाचे ज्ञान दिल्यास उत्पादनात वाढ

## प्र-कुलगुरू पी. एस. पाटील; शिवाजी विद्यापीठात रेशीमशास्त्र कौशल्य व तंत्रज्ञान कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. १६ :** शेतकरी हुशार असतोच, मात्र त्याला विज्ञानाची जोड मिळाल्यास रेशीम शेती उत्पादन आणि गुणवत्तेत नक्कीच वाढ होईल आणि शेतकऱ्यांचे अर्थशास्त्र बदलण्याबरोबरच स्वावलंबनात भर पडेल, असा विश्‍वास शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केला. प्राणीशास्त्र विभाग सेंटर ऑफ एक्सलन्स ॲण्ड इन्क्युबेशन सेरिकल्चर यांच्यातर्फे एकदिवसीय राज्यस्तरीय रेशीमशास्त्र कौशल्य व तंत्रज्ञान कार्यशाळा शिवाजी विद्यापीठात झाली. या वेळी ते बोलत होते. कार्यशाळेत



**कोल्हापूर : राज्यस्तरीय रेशीमशास्त्र कौशल्य व तंत्रज्ञान कार्यशाळेत सहभागी शेतकरी व शिवाजी विद्यापीठातील अधिकारीवर्ग.**

राज्यातील १२ जिल्ह्यांतील ५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. आर. के. कामत यांनी यापुढे विद्यापीठ राज्य राष्ट्रीय संस्थाकडूनही शेतकऱ्यांच्या हितासाठी विद्यापीठामार्फत विविध संकल्पना आणि योजना उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अशिष देशमुख यांनी रेशीम शेतीमध्ये प्राणिशास्त्र विभागाने तुती हा कल्पवृक्ष केलाच आहे. मात्र, रेशीम कीटक ही कल्पवृक्षापेक्षा कमी नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस उत्पादनात भरीव वाढ करावी त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आमच्याकडून दिले जाईल, अशी ग्वाही दिली. उस्मानाबादचे बापू नहाने यांनी सूत्रसंचालन केले. राधानगरी तालुक्यातील दीपक शेट्टी, सांगोल्याचे विष्णू काशीद, पुणे येथील विजय गारगोटे या रेशीम शेतकऱ्यांनी यशकथांची सविस्तर माहिती दिली. अभियंता दामोदर पांढरे यांनी मनोगत व्यक्त केले. रेशीमशास्त्राचे समन्वयक डॉ. अधिकराव जाधव यांनी राज्यातील शेतकऱ्यांना कोरोनाकाळात १०५ कार्यशाळांच्या माध्यमातून अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना सोशल मीडियाद्वारे ज्ञान सहजपणे त्यांच्यापर्यंत बांधावर पोचवण्याचं कार्य केल्याचे सांगितले. यावेळी कृषी विभागाचे उपसंचालक रवींद्र फाटक उपस्थित होते.

17 JUL 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर रेशीम शेतीच्या उत्पादनात वाढ होईल

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील : शेतकऱ्यांसाठी प्राणीशास्त्र विभागांतर्गत रेशीमशास्त्रची कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

रेशीम शेती करणारे शेतकरी कौशल्यप्राप्तीसाठी राज्यभरातून विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागात शिक्षण घेतात. या शेतकऱ्यांनी प्रवेश घेतलाच परंतू यशस्वीपणे परीक्षाही दिली. शेतकऱ्यांच्या समाज हितासाठी विद्यापीठ प्रयत्न करीत आहे, याची ही पोहोचपावती आहे शेतकरी हुशार असतोच मात्र त्याला विज्ञानाची जोड मिळाल्यास रेशीम शेती उत्पादन आणि गुणवत्तेत नक्कीच वाढ होईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभाग सेंटर ऑफ एक्सलन्स अन्ड इनक्युबेशन सेरिकल्चरच्या वतीने निलांबरी हॉलमध्ये एक दिवसीय राज्यस्तरीय 'रेशीम शास्त्र कौशल्य व तंत्रज्ञान" कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. राज्यातील १२ जिल्ह्यातील ५० पेक्षा जास्त शेतकरी या कार्यशाळेसाठी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागांतर्गत रेशीमशास्त्र कार्यशाळेतील सहभागी शेतकरी, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. आर. के. कामत, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. आशिष देशमुख आदी.

डॉ. पाटील म्हणाले, शेतकऱ्यांचा अर्थशास्त्र बदलेल असून स्वावलंबन तसेच स्वाभिमान आहे. शेतकरी शास्त्रज्ञ झाला पाहिजे त्यासाठी लागणारं ज्ञान विद्यापीठ प्रशासन देईल. चंद्रपूरपासून ते सिंधुदुर्गपर्यंत शेतकरी उपस्थित आहेत. येथे शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच स्वतःचा रेशीम शेतीतील आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्यांची तळमळ दिसून येते. शेतकऱ्यांच्या हितासाठी विद्यापीठामार्फत विविध संकल्पना आणि योजना उपलब्ध करून देण्यास आम्ही कटिबद्ध आहे.

दामोदर पांढरे म्हणाले, शेतकऱ्यांचा उत्साह आणि नावीन्यपूर्ण ज्ञानासाठी त्यांची असणारी तळमळ ही खरोखर विद्यार्थी आणि इतरांनाही दिशादायक ठरणार आहे. डॉ. अशिष देशमुख म्हणाले, रेशीम शेतीबरोबर ऊस उत्पादनात भरीव वाढ करावी. त्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आमच्याकडून दिले जाईल. रेशीम शेती अंडीपुंज निर्मिती धागा निर्मिती रेशीम शेती सेवा केंद्र अशा अनेक विषयावर मार्गदर्शन केले. उस्मानाबाद बापू नहाने, राधानगरी तालुक्यातील दीपक शेट्टी, सांगोला येथील विष्णू काशीद, पुणे येथील विजय गारगोटे, डॉ. ए. डी. जाधव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्राध्यापक डॉ. आर. के. कामात कृषी विभागाचे उपसंचालक रविंद्र फाटक, इंजिनीयर दामोदर पांढरे आदी उपस्थित होते.

पुढारी

# विज्ञानाची जोड मिळाल्यास रेशीम शेती उत्पादन वाढेल

## प्र-कुलगुरू पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शेतकरी हुशार असतोच मात्र त्याला विज्ञानाची जोड मिळाल्यास रेशीम शेती उत्पादन आणि गुणवत्तेत नक्कीच वाढ होईल, शेतकऱ्यांचा अर्थशास्त्र बदलेल आणि शेतकऱ्यांचे स्वावलंबन तसेच स्वाभिमान ही वाढेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इंक्युबेशन इंन सेरिकल्चर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यामार्फत एक दिवसीय राज्यस्तरीय रेशीम शास्त्र कौशल्य व तंत्रज्ञान कार्यशाळा शिवाजी विद्यापीठात घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. आर. के. कामत, प्राणीशास्त्र विभागाचे अधिकारी विभाग प्रमुख प्रा. आशिष देशमुख, रेशीम शास्त्राचे समन्वयक डॉ. अधिकराव जाधव यांचे उपस्थितीत होते. नीलांबरी ऑडिटोरियम येथे हा कार्यक्रम झाला.

यापुढे आमचा शेतकरी शास्त्रज्ञ झाला पाहिजे, त्यासाठी लागणारे ज्ञान विद्यापीठातील प्राध्यापक तसेच विद्यापीठातल्या प्रशासन यासाठी नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील, असे दिसेल प्रा. कामत यांनी सांगितले. चंद्रपूरपासून सिंधुदुर्गपर्यंत शेतकरी या कार्यासाठी कार्यशाळेसाठी उपस्थित राहिले, यावरून शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण संकल्पना तसेच स्वतःचा रेशीम शेतीतील आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्यांची तळमळ दिसून येते. यासाठी यापुढे विद्यापीठ राज्य राष्ट्रीय तसेच कर संस्थाकडून ही शेतकऱ्यांच्या हितासाठी विद्यापीठामार्फत विविध संकल्पना आणि योजना उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. प्राणिशास्त्र विभागाचे डॉ. ए. डी. जाधव यांनी सांगितले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेसाठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेसाठी अर्ज सादर करण्याची मुदत २० जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे. अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन समिती प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक तसेच विद्या परिषदेमध्ये निवडून द्यावयाच्या आठ शिक्षक आणि अभ्यास मंडळासाठी निवडून द्यावयाचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करण्यात येत आहे. यासाठी १५ जुलैपर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत होती. परंतु कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत आहे. नद्यांना पूर आले असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. त्यामुळे अर्ज सादर करण्याची मुदत २० जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे, असे विद्यापीठाने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

17 JUL 2022
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभा निवडणूक : कागदपत्रे जमा करण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन पद्धतीने पदवीधर नोंदणी करण्यात आली होती, तर ऑफलाईन पद्धतीने कागदपत्रे जमा करण्यास असलेली मुदत वाढवून २० जुलै करण्यात आली आहे. कार्यक्षेत्रातील पावसाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठ अधिसभेच्या प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, नोंदणीकृत पदवीधर आणि शिक्षक, तसेच विद्या परिषदेमध्ये निवडून द्यावयाचे आठ शिक्षक, अभ्यास मंडळासाठी निवडून द्यावयाचे विभागप्रमुख यासाठी मतदार यादी तयार करण्यासाठी दि. ११ जुलैपर्यंत ऑनलाईन स्वरूपात माहिती भरण्यात आली आहे. ऑनलाईन भरलेल्या माहितीची कागदपत्रे दि. १५ जुलैपर्यंत ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाची होती; परंतु कोल्हापूरसह सांगली व सातारा या तीनही जिल्ह्यांत पावसामुळे गावांचा संपर्क तुटला आहे. ही बाब लक्षात घेऊन निवडणुकीच्या अनुषंगाने ऑनलाईन स्वरूपात भरलेली माहिती, तसेच आवश्यक कागदपत्रांसह विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करण्यासाठी दि. २० जुलै रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदत वाढवण्यात आलेली आहे.